११०८५

जा.क्र.साआ/प्रशा-३/श्रीराम ससाका/आसवणी-इतिवृत्त /१७
साखर आयुक्तालय महाराष्ट्रराज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर पुणे - ०५
दिनांक - १४ नोव्हेंबर , २०१७.

प्रति,
कार्यकारी संचालक,
श्रीराम सहकारी साखर कारखाना लि. फलटण,
ता. फलटण, जि. सातारा.

**विषय :- आसवणी देशीमदय विभाग व कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प इत्यादी लीज पध्दतीने चालविण्यास देण्याबाबत**

संदर्भ :- शासन पत्र क्रमांक.ससाका २०१७/प्र.क्र.२१६/३-स दिनांक २५.९.२०१७ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

विषयांकित बाबतची बैठक साखर आयुक्त कार्यालयात दिनांक १७.११.२०१७ रोजी सकाळी ११:०० वाजता संपन्न झाली. सबब सोबत जोडलेल्या इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

साखर आयुक्त
महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत:- प्रादेशिक सहसंचलाक (साखर) पुणे विभाग पुणे.

-:इतिवृत्त:-

श्रीराम सहकारी साखर कारखाना लि. फलटण ता.फलटण जि. सातारा या कारखान्याची आसवणी देशीमद्य विभाग व कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प इत्यादी लीज पध्दतीने चालविण्यास देण्याबाबत मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.८.२०१७ रोजी मंत्रालय मुंबई येथील बैठकीत झालेल्या निर्णयानुसार शासनाकडून प्राप्त इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कारखान्यास कळविण्यात आले होते. त्यानुसार आसवणी प्रकल्प भाडेतत्वावर देण्याबाबत निविदा ऑनलाईन पध्दतीने प्राप्त करण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा प्रसिध्दीचे कालावधी अखेर एकुण २ निविदा ऑनलाईन पध्दतीने व ३ निविदा ऑफलाईन पध्दतीने प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार निर्णय घेण्यासाठी दिनांक १७.११.२०१७ रोजी संबधितांची साखर आयुक्तालयात बैठक आयोजित करण्यात आली.सदर बैठकीस कारखान्याचे चेअरमन, कार्यकारी संचालक व इतर पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीमध्ये दोन ऑनलाईन व तीन ऑफलाईन निविदा प्राप्त झाल्याबाबत कारखान्याने सांगितले.तथापी किमान ३ ऑनलाईन निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता प्रस्तुत प्रकरणी निविदेच्या कालावधीस ८ दिवसाची मुदतवाढ देण्यात येऊन सदर वाढीव कालावधीत प्राप्त निविदा विचारात घेऊन पुढील प्रक्रिया राबविण्यात यावी असा निर्णय झाला.

साखर आयुक्त

महाराष्ट्र राज्य पुणे